# आजी

तुझ्या आठवणी, तुझे संस्कार आमच्या जीवनप्रवासात मार्ग दाखवतात
प्रत्येक आठवणीगणिक मन गहिवरून येतं...
एखादा विशाल वृक्ष दिसला कि आठवलं तुझं मोठं मन...
एखादा झरा दिसला कि आठवण येते तुझ्या प्रेमाची...
पाळण्यातलं बाळ हसलं कि आठवते तुझी निरागसता...
इंद्रधनुकडे पाहून आठवण येते तुझ्या विविध कलागुणांची...
वसंत ऋतूत दरवळणाऱ्या फुलांच्या सुगंधाने आठवतात तुझे पदार्थ...
ग्रीष्म ऋतूतला कोरडा निसर्ग बघून झळ कळते तुझ्या यातनांची...
कोकिळेच्या मधुर स्वराने आठवतात तू गायलेल्या भजनांचे बोल...
तप्त धरतीवर पावसाचा पहिला शिडकाव पडला कि
आठवण येते तू आमच्या जखमांवर घातलेल्या फुंकरीची...
गुलाबी थंडीत आठवण येते तुझ्या उबदार मायेची...
मन व्याकुळ झालं की आठवण येते तुझ्या देवघरातल्या कृष्णाची...
पक्षांचे घरटे पाहून आठवण येते तुझ्या घराची
आमच्या वाटेकडे लावून बसलेल्या तुझ्या दोन डोळ्यांची...
बालपणी तुझ्याबरोबर साजरा केलेला प्रत्येक सण
ऊर्जा देते आम्हाला त्याची नुसती आठवण...
नदीकडे पाहिलं की आठवण येते
तुझ्या औदार्याची...
समुद्राकडे पाहिलं की आठवण येते
तुझ्या संस्कार शिंपल्यांची...
तू देतच होतीस आणि आम्हाला वेचायलाही शिकवलंस
प्रत्येक शिंपल्या गणित
आम्ही आणखी श्रीमंत होत गेलो...



- प्रीती अमित सगदेव
M 9822032018